**सफाई कामगारांच्या/कर्मचाऱ्यांच्या वारसास वारसा पध्दतीने नेमणूक देण्याची कार्यपध्दतीबाबतच्या शासन निर्णयात सुधारणा करण्यासाठी समिती गठीत करणेबाबत-**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सफाई २०१५/प्र.क्र.२६८/महामंडळे**
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-३२.
दिनांक : ०२ फेब्रुवारी, २०१६

**संदर्भ :**

शासन निर्णय क्रमांकः सफाई-२०१५/प्र.क्र.२६८/महामंडळे, दि.१० नोव्हेंबर, २०१५.

**प्रस्तावना :**

रिट पिटीशन क्र.६१५५/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालय,खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये, राज्य शासनाच्या विविध विभागांनी यापूर्वी लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसांना वारसा पध्दतीने शासकीय/निमशासकीय सेवेत नियुक्ती देण्याबाबत निर्गमित केलेले सर्व शासन आदेश, शासन निर्णय/शासन परिपत्रक अधिक्रमित करून सफाई कामगारांच्या/कर्मचाऱ्यांच्या वारसास वारसा पध्दतीने नेमणूक देण्याची कार्यपध्दती यापुढेही सुरू ठेवणेबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर आदेशामध्ये सुधारणा करण्यासाठी विविध मान्यवर/सफाई कर्मचारी संघटना यांच्याकडुन विभागास निवेदने प्राप्त झाली आहेत. सदर निवेदनांवर विचारविमर्श करून निर्णय घेण्यासाठी एक समिती गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

संदर्भाधीन शासन निर्णयाच्या अनुषंगाने प्राप्त निवेदनांन्वये सुचविण्यात आलेल्या सुधारणांचा सर्वंकष विचार करून उचित सुधारणा सुचविण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १. | उप सचिव/सह सचिव (महामंडळे) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | अध्यक्ष |
| २. | सह सचिव/उप सचिव,सामान्य प्रशासन विभाग (सेवा) | सदस्य |
| ३. | सह सचिव/उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (१६-ब) | सदस्य |
| ४. | सह सचिव/उप सचिव, उद्योग,उर्जा व कामगार विभाग | सदस्य |
| ५. | सह सचिव/उप सचिव,नगर विकास विभाग | सदस्य |
| ६. | सह सचिव/उप सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| ७. | सह सचिव/उप सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ८. | सह आयुक्त/उपआयुक्त,समाज कल्याण आयुक्तालय,पुणे | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ९. | श्री.सुधीर रमाकांत जानजोत, नगरसेवक, पुणे महामनगरपालिका तथा सल्लागार, अखिल भारतीय सफाई कामगार संघटन, नवी दिल्ली | सदस्य |
| १०. | श्री.धनराज चावरीया, अध्यक्ष, अखिल भारतीय सफाई कामगार संघटन, नवी दिल्ली | सदस्य |
| ११. | ॲड.कबीर बिवाल, राष्ट्रीय महासचिव, अखिल भारतीय सफाई कामगार संघटन, नवी दिल्ली | सदस्य |
| १२. | अवर सचिव (महामंडळे/विजाभज-१),सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| १३. | कक्ष अधिकारी (महामंडळे), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य-सचिव |

२. उपरोक्तपणे गठीत करण्यात आलेल्या समितीने पहिल्या बैठकीपासून दहा दिवसांच्या कालमर्यादेमध्ये आपला अहवाल प्रधान सचिव (सा.न्या.व वि.स.) यांना सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०२१८०९४७९६२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Uma Maheshchandra Sawant

Digitally signed by Uma Maheshchandra Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400089, st=Maharashtra, cn=Uma Maheshchandra Sawant
Date: 2016.02.02 18:20:18 +05'30'

**(उ.म.सावंत)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव,मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय,मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
४. मा.मंत्री(सा.न्या.व वि.स.) /राज्यमंत्री (सा.न्या.व वि.स.) यांचे खाजगी सचिव
५. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव साप्रवि (सेवा/का.१६ ब),नगरविकास
७. विभाग,उद्योग,उर्जा व कामगार विभाग,सार्वजनिक बांधकाम विभाग,सार्वजनिक

८. आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई-४०००३२.

९. सह आयुक्त/उपआयुक्त,समाज कल्याण आयुक्तालय,पुणे

१०. अवर सचिव/उप सचिव,महामंडळे,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

११.श्री.सुधीर रमाकांत जानजोत, नगरसेवक, पुणे महामनगरपालिका तथा सल्लागार, अखिल भारतीय सफाई कामगार संघटन, नवी दिल्ली

१२. श्री.धनराज चावरीया, अध्यक्ष, अखिल भारतीय सफाई कामगार संघटन, नवी दिल्ली

१३.ॲड.कबीर बिवाल, राष्ट्रीय महासचिव, अखिल भारतीय सफाई कामगार संघटन, नवी दिल्ली

१४. निवडनस्ती,महामंडळे